Press room

# ट्रॅकॉन कुरिअर कंपनीच्या नावाने खोटे सिमकार्ड खरेदी करून कंपनीची २,१४,०००/- रूपयांची फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर पोलीस ठाणेकडून अटक

ट्रॅकॉन कुरिअर कंपनीने माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये आयडीया कंपनीचे डिस्टब्युटर मे. गेटवे कंपनीचे चंदन गुप्ता रा. भोसरी, पुणे याचे कार्यालय पत्ता- शॉप नं.२०, गुरीतेज बहाद्दुर सोसा. एलआयसी बिल्डींगच्या समोर, खडकी स्टेशनच्या जवळ, औंध रोड, बोपोडी, याचेकडून कंपनीकरिता सिमकार्ड खरेदी करावयाचे असल्याने कंपनीच्या लेटर हेडवर ३४ पोस्टपेड सिमकार्ड मिळणेकामी विनंती केली होती. त्यानुसार गेटवे कंपनीचे चंदन गुप्ता याने ३४ आयडीया कंपनीचे पोस्टपेड सिमकार्ड दिले. सदर सिमकार्ड हे ॲक्टीव्ह करून ते वापरले त्यापैकी २० सिमकार्ड साधारण माहे मे २०१९ मध्ये आमचे कंपनीने बंद केले. सध्या १४ सिमकार्ड चालू आहे. त्याचे दरमहा होणारे बिल कंपनी भरत होती. माहे मार्च २०१९ मध्ये गेटवे या आयडीया कंपनीचा मालक चंदन गुप्ता याने ट्रॅकॉन कुरिअर कंपनीच्या लेटरहेडचा गैरवापर करून एकूण ४९१ सिमकार्ड कंपनीच्या परवानगी शिवाय ॲक्टीव्हेट केलेले आहेत. सदर ४९१ सिमकार्ड वापरलेबाबत कंपनीस २,१४,०००/- इतके बिल प्राप्त झाल्याने फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. २०६/१९ भा.द.वि. कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्ह्याचे समांतर तपास करीत असताना आरोपी नामे चंदन गुप्ता रा. भोसरी, पुणे याचा तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेतला असता तो मिळून आल्याने त्यास पुढील तपासकामी फरासखाना पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले. सदर आरोपीकडून ४९१ सिमकार्ड जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशन करीत आहेत.

सदरची कामगिरी अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, संभाजी कदम, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, निलेश मोरे, सहा. पोलीस आयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे पुणे शहर यांच्या मार्गदर्शनानुसार राधिका फडेक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी त्यांचे पथक पो.ना. राजकुमार जाबा, पो.शि. शाहरूख शेख, पो.शि. नवनाथ जाधव, पो.शि. अनिल पुंडलिक यांनी केली आहे.